

लव्ह गेम
- अनिकेत समुद्र

ए बंड्या !! अरे झोपला का? चल सिग्नल सुटला. निमीष च्या आवाजाने रोहन भानावर आला. त्याने स्कॉर्पियो गेअर मध्ये टाकली आणि गर्दीतुन वाट काढत पुढे निघाला. त्याचे लक्ष मात्र स्कॉर्पियोच्या आरश्यातच होते. पुढचा सिग्नल लागला आणी रोहन परत आरश्यात पहाण्यात दंग झाला. यावेळेसही निमीष ला रोहनला सिग्नल सुटल्याची जाणीव करुन द्यावी लागली. त्यामुळे पुढच्या सिग्नलला निमीष सावध होता. सिग्नल सुटायच्या आधीच त्याने रोहनकडे बघीतले.

रोहन स्वःताशीच हसत स्कॉर्पियोच्या आरश्यातुन मागे बघत होता.
"अरे काय झालेय तुला? लक्षं कुठेय तुझं ?" निमीषने काहीश्या वैतागलेल्या सुरात रोहन जिकडे बघत होता तिकडे मागे वळुन बघत रोहनला विचारले.
"काही नाही रे!"- रोहन
"काही नाही? मग तु वळुन वळुन मागे काय बघत आहेस?"- निमीष
निंमीषची उत्सुकता जागृत झाली आणी त्याने गाडीच्या आरश्यातुन मागे बघीतले.

मागे पिंक रंगाच्या स्कुटी वर एक मुलगी आपल्याच नादात तिच्या गाडीच्या आरश्यात बघुन एका हाताने डोळ्यातील कॉन्टाक्ट लेन्स निट करत, तर दुसऱ्या हाताने चेहऱ्यावर येणारी केसांची बट सावरत होती.

"Man, She is damn cute !!", निमीष स्वतःशीच पुटपुटला.
"I know", रोहन.
"काय साहेब, तुम्ही कधी पासुन असल्या गोष्टींमध्ये इंटरेस्ट घ्यायला लागलात?", रोहनच्या पाठीवर थाप मारत निमीष म्हणाला.
"प्लिज हा. इंटरेस्ट वगैरे काही नाही, एक सिग्नलवरचा विरंगुळा, एवढचं!" – रोहन

तेवढ्यात सिग्नल सुटला. रोहनने आपल्या घड्याळावर नजर टाकली आणि आपल्या स्कॉर्पियोला वेग दिला.

"सकाळी सकाळी इंटरव्हु म्हणजे खरंच वैताग आहे हं!. आणी तो पण फ्रेशर्स चा?, कॉलेज प्रोजेक्ट साठी???" – रोहन

"हो ना. सकाळ म्हणजे मस्त कॉफी पित, मेल्स, ऑर्कुट बघण्याची वेळ. आपले एच.आर पण ना!! समोरचा म्हणाला ९ वाजता येतो इंटरव्हुला की लगेच हो म्हणणार. अरे आपल्या कंपनीचे पण काही स्टेटस आहे की नाही? हे कॉलेज स्टुडंस, साला आपल्याच डोक्याला त्रास होणार आहे." निमीष ने ही आपला त्रागा व्यक्त केला.

रोहनने गाडी कंपनीच्या "रिझर्व्हड पार्कींग" मध्ये पार्क केली. निमीषने तोपर्यंत लिफ्ट चे बटन दाबले होतेच. लिफ्ट येताच दोघेही जण आत घुसले आणी कंपनीत आले.

"We are 15 mins late! एच.आर. कडुन खा आता शिव्या" असा विचार करतच दोघेही कॉन्फरंन्स रुम मध्ये आले. बघतात तर आत मध्ये कोणीच नाही.

“घ्या!! एवढी धावपळ करुन या.. आणी इथे कॅन्डीडेटच हजर नाही..”- निमीष परत चालु झाला. दोघेही परत बाहेर आले, तेवढ्यात ऑफीसच्या दारातुन त्यांना सिग्नलवर दिसलेली ‘ती’ आत येताना दिसली.

हिरव्या रंगाचा पुल-ओव्हर, काळी ३/४थ जीन्स, गुलाबी रंगाचा हेअर बॅन्ड, हातात घट्ट धरलेली फाईल, डोळ्यांत गोंधळलेले भाव.!!

“काय अवतार आहे! असे कोणी इंटरव्ह्युला येते का?”- रोहन, “हे असले कपडे कोणी दुसऱ्याने घातले असते तर भयानकच दिसले असते. But just because she is wearing it, she is… she is looking….”
“Awesome!!” निमीषने रोहनचे अर्धवट वाक्य पुर्ण केले.

रितुने आत आल्यावर समोर उभ्या असलेल्या आणी ‘फॉर्मल्स’ मधल्या त्या दोघांकडे पाहीले. ‘आधीच एक तर उशीर झालेला त्यात आपले कपडे इथे जरा मिस-मॅचच दिसत आहेत’ असा एक विचार तिच्या मनात येउन गेला. तरी घरुन निघताना तिची आई तिला म्हणालीच होती, “काय रितु तुझे कपडे हे, अगं इंटरव्ह्युला चालली आहेस ना?”

तेव्हा तिनेच आईला सांगीतले होते, “काय गं मम्मा, मी काय गव्हर्नमेंट सर्व्हिससाठी चालले आहे का? I am going in Advertising Agency. I am a “Mass Communication” student, आणि तिथले सगळेही अश्याच वातावरणातुन आलेले असणार. These clothes will perfectly go with the environment. Don’t worry”

रोहनने तोपर्यंत इंटरव्ह्यु कॅन्डीडेट्स ची लिस्ट काढली आणि पहीले नाव वाचले, “रितु प्रधान”. स्वतःचे कपडे ठिक-ठाक केले, केसांमधुन एक हात फिरवला आणि रिसेप्शन मध्ये गेला.

चेहऱ्यावर नेहमीचेच ‘चार्मींग स्माईल’ आणुन त्याने शक्य तितक्या कमी आवाजात विचारले, “रितु प्रधान?, प्लिज कम धिस वे!” रोहनला आपल्या चार्मींग स्माईलवर फार विश्वास होता. त्याला माहीत होते की या स्माईल मुळे तो अधीकच स्मार्ट आणि आकर्षक दिसतो. परंतु रितु वर त्याचा काहीच प्रभाव पडला नाही हे पाहुन त्याचा फारच जळफळाट झाला.

पुढचा जवळ-जवळ एक तास इंटरव्हु संपवुन जेंव्हा दोघे बाहेर आले तेंव्हा दोघांच्या चेहर्यावर समाधान होते. ‘She is good, what say?’ निमीषने रोहनला विचारले. रोहननेही त्याला संमती दाखवली. आठवड्याभरातच रितुने ऑफीस जॉईन केले.
पुढचा एक महीना रितु साठी खुपच धावपळीचा होता. कॉलेजमध्ये शिकवलेले ज्ञान किती तोकडे आणि व्यवहारासठी बिनकामाचे आहे याची जाणीव झाली. प्रोजेक्ट शिकुन घेणे, ऑफिसमधील चालीरीती, सहकारी त्यांचे विचीत्र स्वभाव यांच्याशी जुळवुन घेणे चालुच होते. पण या सगळ्यांत तिला रोहनची खुप मदत होत होती. त्याच्या वागण्यात कुठेही ‘टीम-लिडर’ चा तोरा नव्हता. ‘कदाचीत म्हणुनच तो सगळ्यांचा आवडता आहे’, रितु स्वतःच्याच विचारात मग्न होती. तेवढ्यात संगणकाच्या स्क्रिनवर तिच्या कलीगचा इशाचा मेसेज चमकला
‘.. कॉफी?’
‘येस.. शुअर’
‘चल देन’

कॉफी पिता पिता रितुने सहजच विषय काढला, ‘रोहन किती वर्ष आहे गं इकडे?’
‘ऐss स्टे इन द क्यु.. ओके?’, इशा
‘क्यु?? व्हॉट क्यु?’ न कळल्याने रितुने विचारले.
‘हे बघ, तुलाही जरी रोहन आवडत असेल ना तरीही त्याला पटवण्याचा प्रयत्न करु नकोस हा.. इथे ऑलरेडी क्यु आहे ‘ इशा
‘ओह.. नाही गं. तसं काही नाही, मी आपलं अस्संच विचारलं’ रितु

संध्याकाळी घरी आल्यावर रितु आरश्यामध्ये स्वतःचे प्रतीबिंब न्हाहाळत् विचार करत होती. “रोहन काही ‘हंक’ वगैरे नाही, पण क्युट आहे, जस्ट लाईक बॉय नेक्स्ट डोअर!!. छान आहे तो. तो बरोबर असला की किती कंफर्टेबल वाटतं, तो हसला की आपण नकळत हसतो, एखाद्या वेळेस तो दिसला नाही की आपली कावरी-बावरी नजर त्याला शोधत रहाते.. तो दिसे पर्यंत. त्याचे प्रेझेंटेशन स्किल्स अफाट आहेत, क्लायंटशी किती मस्त बोलतो तो.. असं वाटतं ऐकतच रहावे. आणि त्याची स्माईल.. डिंपल स्माईल.. अगदी क्रेझी करुन टाकते. पण इशा म्हणते तसं.. असेल खरं असेल, तो कुणालाही आवडावा अस्साच आहे. पण तो कुणाला भाव देत नाही हे ही खरंच आहे. मी आवडत असेन त्याला? काय विचार करत असेल तो माझ्याबद्दल? मी पण काही वाईट नाही. कॉलेजमध्ये किती मुलं होती माझ्या मागे!!. मी पटवलं तर नक्की पटेल रोहन मला.. मी पटवेनच त्याला..”
रितुला स्वतःचेच हसु आले..

रोहनचा मुड आज खुपच खराब होता. क्लायंटने ऐन वेळेस बरेचसे बदल सांगीतले होते त्यामुळे तो खुपच अपसेट झाला होता. दुपारच्या नेहमीच्या रिव्हु मिटींगला सुध्दा तो आपले यायचे म्हणुन आला होता. खरं तर चर्चा करण्यासारखे काही नव्हते, पण आपली फॉर्मालिटी म्हणुन ती एक मिटींग होती. तो आत आला तेंव्हा सगळेजण आधीच येउन बसले होते. त्याची नजर रितु वर खिळली. लेमन कलरचा टॉप आणि क्रिम कलरची ३/४थ मध्ये खुप गोड दिसत होती ती. रोहनने दोन सेकंद तिच्याकडे पाहीले आणि तो जागेवर जाउन बसला.

मिटींगमध्ये विशेष असे काही नव्हते. लोक ये जा करत होती, लोकांचे सेल फोन वाजत होते काहीजण लॅपटॉप वर काम करण्याच्या नावाखाली चॅटींग करण्यात मग्न होते. रोहन जाम वैतागला होता. रितु आणि इशाचे काहितरी गॉसिपिंग चालु होते. त्यांची खुस-पुस त्याला बऱ्याच वेळापासुन इरीटेट करत होती. शेवटी न रहावुन तो उठला आणि रितुला उद्देशुन जोरात ओरडला,

‘Shut Up!! Don’t you understand a serious meeting is going on here. If you do not understand the work culture and seriousness of a work, then please quit and go back to your college’

अचानक झालेल्या या प्रकारामुळे सगळे एकदम शांत झाले. रितुसाठी रोहनचे हे रुप नवीनच होते, अनपेक्षीत होते. सगळ्यांसमोर बोलणी बसलेले तिला सहन झाले नाही, आणि ती स्वतःचा चेहरा खाली घालुन, स्वॉरी म्हणुन बाहेर निघुन गेली. बाहेर जाताना पाण्याने भरलेले तिचे डोळे कुणाच्या नजरेतुन सुटले नाहीत. रितु बाहेर पडताच शर्मिलाच्या लॅपटॉपवर इशा चा मेसेज झळकला, “बिच!!.. लुक हाउ शी ऍक्टेड, जस्ट ट्रायींग इमोशनल सो दॅट रोहन विल फेल फॉर हर, आय थिंक शी गॉट व्हॉट शी आस्क्ड फॉर” दोघींची नजरानजर झाली आणि त्यांनी एक चोरटी स्माईल एकमेकींना दिली.

थोड्यावेळाने रोहनचा बॉस त्याला म्हणाला, "रोहन तु उगाच तिला ओरडलास. शी इज जस्ट अ फ्रेशर, जस्ट कॉलेज पास्ड आऊट. तिला वेळ लागेल सिरीयसनेस यायला. आणि तसेही इथे कोण सिरीयसली मिटींगला आले आहे तु सांग. तु तुझे फ्रस्ट्रेशन उगाचच तिच्यावर काढलेस!!"

रोहनलाही त्याची चुक लक्षात आली, पण आता वेळ निघुन गेली होती. तो बाहेर आला तेंव्हा रितु घरी निघुन गेली होती.

दुसऱ्या दिवशी रितु ऑफिसला आली तेंव्हा तिच्या डेस्क वर एक 'सुर्यफुल' ठेवलेले होते आणि संगणकाच्या मॉनीटरला स्टिकी नोट्स वर लिहीले होते 'स्वॉरी, प्लिज किप गोईंग विथ युअर चार्मींग सनी स्माईल फॉर दिस सनफ्लॉवर – रोहन'

'स्ट्युपीड', रितु स्वतःशीच म्हणाली, 'काय तर म्हणे सुर्यफुल, चांगले कुठले फुल मिळाले नाही का द्यायला?'

लंच नंतर रोहनने 'नॉलेज शेअरींग' चे सेशन त्याच्या टिमसाठी ठेवले होते. ब्ल्यु शर्ट, फिक्कट हिरव्या रंगाच्या पॅन्ट मध्ये रोहन नेहमीसारखाच हँडसम दिसत होता. सेशन सुरु झाले, पण रोहनचे लक्ष प्रेझेंटेशन पेक्षा रितुवरच जास्त होते. आपला प्रत्येक मुद्दा संपल्यावर 'आर यु क्लिअर विथ धिस मिस. रितु?' आपल्या भुवया थोड्याश्या उंचाउन, चेहऱ्यावर आपले नेहमीचे चार्मींग स्माईल आणुन रोहन रितुला विचारत होता. तर रितु मात्र 'येस, मि. रोहन' या एकाच प्रकारचे उत्तर देउन संभाषण तोडुन टाकत होती.

टि-ब्रेक मध्ये इशाने रितुला विचारले 'व्हाय आर यु ॲक्टींग लाईक धिस? लकी यु! तुला तो स्वॉरी म्हणाला ना? सो प्रॉब्लेम काय आहे?'
रितुः 'स्वॉरी म्हणाला म्हणुन काय झाले? सगळ्यांसमोर कसा बोलला काल मला तो?'
इशाः 'कमॉन रितु, ग्रो अप. तो बॉस आहे तुझा. त्याने काय आता सगळ्यांसमोर उभे रहावुन कमरेत वाकुन तुझी माफी मागायला पाहीजे का?'
रितुः 'व्हाय नॉट? आवडेल मला'
तिने असे म्हणायला आणि रोहनने तिथुन पुढे जायला एकच वेळ आली.

रितुने पार्कींग मधुन गाडी काढली आणि तिथुन लगेच बाहेर पडली. तिला कधी एकदा लांब जाते आणि मनात साठलेला आनंद व्यक्त करते असे झाले होते. त्याला कारणही तस्सेच होते. दुसरे सेशन संपता संपता, रोहन त्याच्या चेहऱ्यावर गंभीर भाव घेउन उभा राहीला होता आणि रितुशी नजर मिळवुन त्याने तिची सर्वांसमक्ष माफी मागीतली होती.
सगळ्यात शेवटी, "आय होप यु फर्घिव्ह्ड मी मिस. रितु!!" म्हणाला होता आणि रितुने "येस मि. रोहन!" म्हणुन मान डोलावली होती.

पुढील कित्तेक दिवस 'हाय मिस रितु' आणि 'हॅल्लो मिस्टर रोहन' अस्सेच चालले होते. प्रत्येक वेळी रितु खाली वाकुन तिचे हास्य ओठात दाबुन धरायची, तर रोहनची डिंपल स्माईल अजुनच खुलायची. दोघांमध्ये शाब्दिक संभाषण कमी होते, परंतु चेहऱ्याने आणी डोळ्यांनी दोघांमध्ये कित्तेक वाक्य संभाषण होत असे.

‘डु यु थिकं देअर इज समथीं बिटवीन देम?’ ऑफीसमधील प्रत्येकजण दुसऱ्याला विचारत होता. एवढेच काय, एकदा तर लिफ्ट मध्ये दोघे ही जण एकमेकांशी न बोलता, न बघताही हसत आहेत म्हणल्यावर लिफ्टमनही चक्रावला होता. त्यांच्यात वाढत असलेली मैत्री इशाला फारच खटकायची रोहनशी वाढत असलेली रितुची जवळीक तिला नको-नकोसे करुन सोडायची.

आणि शेवटी तो दिवस उजाडला, रितुला ६ महीने पुर्ण झाले होते आणी तिचा कंपनीमधला शेवटचा दिवस होता. तिला फेअरवेल द्यायला सगळेजण कॉमन हॉलमध्ये जमले होते. रितु जाणार या विचारानेच इशा मनोमन खुश होती, तर रोहनचा चेहरा पडलेला होता.

रितीरीवाजाप्रमाने ‘एक्झीट स्पिच’ द्यायला रितु उभी राहीली. तिने सर्व प्रथम कंपनीच्या अधीकाऱ्यांचे धन्यवाद मानले. इथे मिळालेला हा अनुभव तिला भविष्यकाळात खुप उपयोगी पडेल याचा आवर्जुन उल्लेख केला. ज्यांच्या ज्यांच्या बरोबर तिने काम केले आहे त्या प्रत्येकाचा तिने उल्लेख करुन तिने त्यांचेही आभार मानले. मग तिने तिची नजर रोहनकडे वळवली. रोहन अजुनही मान खाली घालुन बसला होता.

‘मिस्टर रोहन,” रितु पुढे बोलु लागली, “आय एम स्पेशली थॅंकफुल टु धिस मॅन. रोहनने खुप मदत केली मला. त्याच्याकडुन शिकायला मिळालेली प्रत्येक गोष्ट माझ्यासाठी अत्यंत मौल्यवान आहे. रोहन, तु या ६ महीन्यात जी साथ मला दिलीस, तीच साथ पुढे आयुष्यभरासाठी देशील? आय लव्ह यु रोहन!!”

पहिल्यांदा आपण जे ऐकतोय ते खरे का खोटे हे कुणालाच कळत नव्हते. कुणाला हे अपेक्षीतच नव्हते. सगळे क्षणभरासाठी अवाक झाले होते, त्यांच्या नजरा रोहनकडे खिळल्या. रोहन उठुन उभा राहीला आणि आपल्या डिंपल स्माईल सहीत म्हणाला, ‘येस मिस्स रितु, आय विल..!! आय लव्ह यु टु!!’
कंपनीचा कॉमन हॉल टाळ्यांच्या कडकडाटाने भरुन गेला.

संध्याकाळची ७ची वेळ, सी.सी.डी (कॅफे कॉफी डे) मध्ये रोहन आणि रितु बसुन गप्पा मारत होते.

रितुः “ए कसला भाव खातोस रे तु? आणि कसली उगाचच शायनींग मारत असतोस ऑफीसमध्ये, नौटंकी आहेस एक नंबरचा तु’
रोहनः “आणि तु काय कमी आहेस का नौटंकी? नुसतं एवढस्स बोललो तुला तर काय लगेच डोळ्यात पाणी वगैरे”
रितुः “असु दे.. पण ते जाउदे.. बघ मी जिंकले की नाही बेट??”


त्यांचे बोलणे ऐकुन शेजारचे २-४ कपल्स कसली बेट जाणुन घेण्यासाठी उत्सुक झाले होते. मग रितुच त्यांना म्हणाली..
“हा रोहन, आम्ही एकमेकांना गेली ३ वर्ष ओळखतो आणि एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालो आहोत. मागच्या व्हॅलेंटाईन्स डे ला, इथेच मी रोहनला म्हणाले होते की हिम्मत असेल तर सगळ्यांसमोर मला ‘आय लव्ह यु’ म्हण.. आणी हा चक्क नाही म्हणाला. मला म्हणे काही काय? असं सोप्प असते का अनोळखी लोकांसमोर ‘आय लव्ह यु’ वगैरे म्हणणं? मग मीच बेट लावली की माझ्यात आहे हिम्मत आणी मी म्हणुन दाखवीन.” योगायोगाने

मला कॉलेज साठी ६ महीने लाईव्ह एक्सपीरियंस हवा होता म्हणुन मी याच्या कंपनी मध्ये अप्लाय केले आणि मला तिथे प्रोजेक्ट एक्स्पिरीयंस साठि संधी मिळाली.. पुढे काय झाले हे तर ऐकलेच तुम्ही!!!"


रोहनः "बर बरं असु देत हा. तु ग्रेट आहेस बास्स? ए पण काही म्हण हं असं एकमेकांना अनोळखी होऊन जगण्यात पण एक मज्जा आहे नाही" असं म्हणुन त्याने रितुला टाळी दिली आणि दोघ हास्य विनोदात मग्न झाले.

सि.सि.डी. मध्ये मागे रेडीओवर गाणे लागले होते.. "चलो एक बार फिरसे, अजनबी बन जाये हम दोनो...!!!'

## प्रतिक्रिया


1.  abhijit says:
   मे 26, 2009 at 9:07 सकाळी (Edit)

   OK ahe !

   प्रत्युत्तर
2.  sachin patil says:
   मे 26, 2009 at 9:14 सकाळी (Edit)

   climax एकदम सही घेतलाय.

   छान जमलीये.

   प्रत्युत्तर
3.  **Vidya** says:
   मे 26, 2009 at 11:24 सकाळी (Edit)


   Heyyyyyyyyy that was such cool concept and great story
   🙂 .....
   खरंतर माझ्या बाबतीत थोडंसं असं झालं होतं. म्हणजे आम्ही दोघे ४ वर्षे सोबत होतो आणि अमेरिकेत एका प्रोजेक्टसाठी वेगवेगळ्या ठिकाणाहून परत एकाच दिवशी एकत्र जॉईन करायला मिळाले. जॉईन करून दोनच दिवस झाल्यावर एकाने विचारलेच. 'आप तो हम सबको दो दिन से ही पहचानती है. तो उसमे ऐसी क्या खास बात है?' 😃 त्याची पण तुझ्या स्टोरीतल्या इशा सारखी जळजळ होत होती.

I wish I cud be ajanabi to him once again.

Very Nice story Aniket.

-विद्या.


प्रत्युत्तर

4.  rohan says:

मे 26, 2009 at 12:25 pm (Edit)

खरी stroy आहे ??? असेल नाहीतर नसेल पण जबरदस्त लिखाण … भन्नाट … जिंकलास रे मित्रा … !


प्रत्युत्तर

-  **अनिकेत** says:

  मे 26, 2009 at 12:27 pm (Edit)

  धन्यवाद, खरी नाही रे.. काल्पनीक आहे


  प्रत्युत्तर

5.  Rohan says:

मे 27, 2009 at 2:18 सकाळी (Edit)

By the way … maz nav suddha rohan ahe … ha ha … !

प्रत्युत्तर

6.  Shreya Bapat says:

मे 28, 2009 at 6:18 pm (Edit)

Hi

Masta jamley goshta. Keep it up!

Shreya

प्रत्युत्तर


7.  **Amol** says:

मे 28, 2009 at 6:32 pm (Edit)

sahhi lihales bhidu!!

-Anaamik

http://anaamik.blogspot.com
प्रत्युत्तर

8. Manju says:
मे 29, 2009 at 10:24 सकाळी (Edit)

ekdam mast jamalay aniket. ekdam mastach

प्रत्युत्तर

9. vasanta says:
मे 29, 2009 at 1:03 pm (Edit)


khoo……p Chan story .mi ajachh navin join zalo. maza ali solid ahe.

प्रत्युत्तर

10. kalyani says:
नोव्हेंबर 2, 2009 at 10:46 सकाळी (Edit)


khup masta story! tu hkup chan lihitos.

प्रत्युत्तर

11. ruchita redkar says:
जानेवारी 13, 2010 at 2:02 सकाळी (Edit)

cool…still reading ur stories its 2 a.m. now…

प्रत्युत्तर

12. **KIRAN & YOGESH GUNJAL** says:
जानेवारी 15, 2010 at 2:48 pm (Edit)


खरी stroy आहे ??? असेल नाहीतर नसेल पण जबरदस्त लिखाण … भन्नाट … जिंकलास रे मित्रा … !

प्रत्युत्तर

13. Sonali Morkar says:
मार्च 12, 2010 at 1:48 pm (Edit)

Khupach chaan aahe hi katha, ekdam sahi.


प्रत्युत्तर

14.  omkar says:

मार्च 15, 2010 at 1:13 pm (Edit)

ek dum mast aahe shevat

प्रत्युत्तर

15.  omkar joshi says:

मार्च 15, 2010 at 1:16 pm (Edit)

ek dum mast aahe shevat good keep it up


प्रत्युत्तर

16.  **सिद्दांत** says:

एप्रिल 7, 2010 at 3:52 pm (Edit)

यार कहानी सच है या नही ये पता नहि. सचमे तुम ग्रेट हो.

प्रत्युत्तर

17.  यतीन says:

मे 24, 2010 at 7:04 pm (Edit)

छोटीशी पण मनोरंजक कथा आहे. आवडली.

प्रत्युत्तर

18.  **SONAL GOSAVI** says:

जुलै 6, 2010 at 4:32 pm (Edit)

GREAT AAHE HI KATHA EKDAM ZKKASSSSSSSSS